F/c

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७
ई-मेल—desk१८@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**संकेतस्थळ /रजिस्टर एडी/ई-मेल द्वारे**

क्र.१८/तंशिसं/एमसीएम/२०२२-२३/२०६
दिनांक : ०५/ ०८ / २०२२

प्रति,
सर्व संबंधित संस्थांचे प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता
( मान्यताप्राप्त व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था )
महाराष्ट्र राज्य.

विषय :- **अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यांची गुणवत्ता -नि - साधन शिष्यवृत्ती योजनांची सन २०२२-२३ साठीच्या अंमलबजावणीबाबत....**

संदर्भ : अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. SS-१५/४/२०२२-Scholarship-MoMA दि. २०.०७.२०२२

उपरोक्त विषयांकीत संदर्भीय पत्रान्वये मान्यताप्राप्त व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व संबंधित संस्थांचे प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता यांना कळविण्यात येते की, अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची गुणवत्ता -नि - साधन शिष्यवृत्ती योजनेच्या महाराष्ट्र राज्यामधील अंमलबजावणीकरिता तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. सदर योजनांची माहिती खालीलप्रमाणे,

## ❖ गुणवत्ता -नि - साधन ( Merit-Cum-Means ) शिष्यवृत्ती योजना ::

सदर योजना **मुस्लिम , बौद्ध, ख्रिश्चन, शीख , पारशी आणि जैन** या अल्पसंख्यांक समाजातील व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये (पदवी व पदव्युत्तर ) शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता लागू करण्यात आलेली आहे.सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित) रुपये २.५० लाखा पर्यंत** निश्चित करण्यात आलेले आहे.

- शिष्यवृत्ती रक्कम :-

सदर योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून नविन व नूतनीकरणाच्या शिष्यवृत्तीसाठी आलेल्या पात्र व मंजूर विद्यार्थ्यांला शिष्यवृत्तीची रक्कम खालील प्रमाणे निर्धारित करण्यात आलेली आहे.

| Sr.No. | Type of Financial Assistance | Rate for Hostler | Rate for Day Scholar |
|---|---|---|---|
| 1. | Maintenance Allowance (For 10 months only) | Rs.10,000/-per annum ( Rs.1000 p.m.) | Rs.5,000/- per annum. ( Rs.500 p.m.) |
| 2. | Course Fee* | Rs.20,000/- per annum or Actual whichever is less | Rs.20,000/- per annum or Actual whichever is less |
| Total | | **Rs.30,000/-** | **Rs.25,000/-** |
| *** Full course fee will be reimbursed for eligible listed institutions.List of listed institute for reimbursement of full course fee is available on www.minorityaffairs.gov.in** | | | |

उपरोक्त योजनेची सविस्तर माहिती केंद्र शासनाच्या अल्पसंख्यांक कार्य मंत्रालयाच्या संकेतस्थळावर ( संकेतस्थळ - www.minorityaffairs.gov.in ) / केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टल (संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) वर देण्यात आलेली आहे

सदर योजनेची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये Direct Benefit Transfer ( DBT ) अंतर्गत जमा करण्यात येईल.

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येतात. **सन २०२२-२३ करिता** सदर योजनेच्या लाभासाठी, प्रवेशित विद्यार्थ्यांनी **नवीन** ( Fresh ) अर्ज व **सन २०२१-२२ मध्ये शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या पात्र** विद्यार्थ्यांनी **नूतनीकरण** (Renewal) अर्ज NSP पोर्टलवर खालीलप्रमाणे जाहीर करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईनरित्या करावे ( अर्ज करण्यापूर्वी मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांनी NSP पोर्टलवर सदर योजनेसाठी उपलब्ध User Manual /Guideline/FAQ चा वापर करावा.)

तसेच, संस्थांनी NSP पोर्टलच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन प्राप्त झालेले अर्ज प्रलंबित न ठेवता पोर्टलवर नमूद अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईनरित्या तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करावी.

| विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याचे व संस्थेने अर्ज तपासणीचे वेळापत्रक :: शै. वर्ष २०२२-२३ | | |
|---|---|---|
| अ.क्र. | कार्यवाही | अंतिम दिनांक |
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरणे. | ३१ ऑक्टोबर, २०२२ |
| २ | संस्थांनी ऑनलाईन अर्जांची तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करणे. | १५ नोव्हेंबर, २०२२ |
| **टीप :: केंद्र शासनाकडून वेळापत्रकात काही बदल झाल्यास सदर बदल एनएसपी पोर्टलवर ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) जाहिर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.** | | |

महत्त्वाची सूचना-

१. संस्थांनी एनएसपी पोर्टलवरील संबंधित योजनांसाठी असलेल्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Institute Profile अद्ययावत करावी.

२. संस्थांनी उपरोक्त योजनेबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून द्यावी जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही.

३. विद्यार्थी केंद्र शासनाच्या ( NSP Portal ) व महाराष्ट्र शासनाच्या ( DBT Portal ) पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबत संस्था प्रमुखांनी स्वत: योग्य ती दक्षता घ्यावी.

४. संस्थेच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले अर्ज जर तपासणीच्या अंतिम मुदतीनंतर संस्था स्तरावर तपासणीसाठी प्रलंबित राहील्यास **किंवा**

५. विद्यार्थ्याने एकाच वर्षाकरिता दोन - दोन शिष्यवृत्ती योजनांचा ( केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही शिष्यवृत्ती योजनांचा ) लाभ प्राप्त करुन घेतल्यास **किंवा**

६. संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास **किंवा**

७. संस्थेमध्ये TFWS अंतर्गत प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

( डॉ. अभय वाघ. )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई.

**प्रत -. यांना माहितीसाठी सविनय सादर.**

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय विस्तार विभाग, मुंबई.
२. मा.अपर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७वा मजला, मंत्रालय विस्तार विभाग, मुंबई.

**प्रत — यांना माहितीसाठी व सदर योजनाची अंमलबजावणीबाबत त्यांच्या संकेतस्थळावर जाहिर करण्यासाठी व त्यांच्या अधिनस्त मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व संबंधित संस्थांना जाहिर वेळापत्रकानुसार न चुकता कार्यवाही पूर्ण करण्याची सूचना देण्याबाबत...**

३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर ( Email id- rooffice@dtemaharashtra.gov.in )
४. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, सीएसटी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई-४०० ००१ ( Email id- dmercetcell@gmail.com ; dmerps@gmail.com )
५. मा. संचालक, आयुष संचालनालय, चौथा माळा, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, सीएसटी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई-४०० ००१ ( Email id- directorayurvedmaha@gmail.com )
६. मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र शासन, मध्यवर्ती इमारत, पुणे-०१ (Email id - schol.dhepune@gov.in )
७. मा. संचालक, कला संचालनालय,सर जे जे स्कूल ऑफ आर्ट कॅम्पस, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट, मुंबई-०१ (Email Id - dirdoa.mum_mah@gov.in )
८. मा. संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, पुणे -४११ ०३७. ( Email Id- edn_mcaer@rediffmail.com; mcaer@rediffmail.com; jtdirector_admin@mcaer.org )
९. मा. संचालक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालय, १७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे- ०१. ( Email Id- dir_adulteducation@yahoo.in; directoradult1@gmail.com
१०. मा. संचालक, इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकाउन्टस ऑफ इंडिया, आयसीएआय टॉवर, प्लॉट नं. सी-४०, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा ईस्ट, मुंबई - ४०० ०५१. ०१ (Email Id - wirc@icai.in )

**प्रत - यांना माहितीसाठी व न चुकता जाहिर वेळापत्रकानुसार कार्यवाही पूर्ण करण्याबाबत...**

११. Head of the Institute, Indian Institution of Technology (IIT), Main Gate Rd, IIT Area, Powai, Mumbai, Maharashtra 400076. ०१ (Email Id - registrar@iitb.ac.in )
१२. Head of the Institute, National Institute of Industrial Engineering, Vihar Lake, P.O. NITIE, Mumbai – 400 078. ०१ (Email Id - registrar@ nitie.ac.in )
१३. Head of the Institute,National Institute of Fashion Technology, Plot no. 15, Service Road, Sector 4, Kharghar, Navi Mumbai, Maharashtra 410210 ०१ (Email Id - director.mumbai@nift.ac.in)
१४. .Head of the Institute,Visvesvaraya National Institute of Technology, S Ambazari Rd, Ambazari, Nagpur, Maharashtra 440010. ०१ (Email Id - dr_acd@vnit.ac.in )

पृष्ठ क्र. तंशिसं/विकाना/ एनएसपी पोर्टल /2022-23/2614
दिनांक :- 10 AUG 2022

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय तंत्रनिकेतन, अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित
**पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम चालविणा-या संस्था**, **नागपूर विभाग**,
नागपूर .

अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय,भारत सरकार,नवी दिल्ली यांच्यामार्फत एनएसपी पोर्टलवरील राबविण्यात येणारी संबंधित शिष्यवृत्तीचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना घेता यावा. याकरिता वरील पत्रात नमुद केलेल्या निर्देशानुसार संस्थास्तरावरून अंमलबजावणी करण्यात यावी.

**(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)**
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर